महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, बीड.
गंगा प्लाझा, सुर्या लान्स जवळ, कॅनोल रोड, शाहु नगर, बीड..

दुरध्वनी क्रमांक 02442-230480 adbeed-mahalfa@mah.gov.in

जा. क्र.स्था १८/ब/ आस्था/स.सं./बीड/ 671 दि. 21.03.2024

प्रति,

---------------------------------------------------
---------------------------------------------------
---------------------------------------------------

विषय :- बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी शिपाई उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील पत्र क्र.संलेको-2020/प्र.क्र.50/कोषा प्रशा 3 दिनांक 14.06.2022

2. मा.संचालनालयाचे पत्र क्र.स्था.18/ब/आस्था7/कंत्राटी शिपाई/मंजुरी/न.क्र.849/129 दि.31.01.2024

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कंत्राटी पध्दतीने शिपाई पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्था/बेरोजगार संस्था यांच्याकडून सोबत जोडलेल्या अटी व शर्ती नुसार आणि त्यासोबतच्या प्रपत्रातील नमुन्यात दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

त्याप्रमाणे सोबत जोडलेल्या अटी व शर्ती मान्य असलेल्या इच्छुक संस्थांनी विहित नमुन्यात दरपत्रके या कार्यालयास दिनांक 05/04/2024 पर्यंत दुपारी 12 वाजेपर्यंत सादर करावेत.

(दि.र.झिरपे)
सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा, बीड.

प्रत-1.सहायक संचालक,संगणक शाखा, संचालनालय,स्थानिक निधी लेखापरीक्षा,म.रा.रायगड भवन नवी मुंबई यांना देऊन विनंती करण्यात येते कि सदरील जाहिरातीस आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

(दि.र.झिरपे)
सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,बीड.

Scanned with OKEN Scanner

## बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (कंत्राटी शिपाई) पुरविणा-या संस्थांसाठी अटी व शर्ती

1. कंत्राटदाराने / पुरवठादाराचे मान्य दर हे करारनाम्याच्या तारखेपासून 11 महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत दर वाढ मंजूर केली जाणार नाही.
2. कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम देय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम रुपये 10,000/- जप्त केली जाईल.
3. वस्तू व सेवाकर, व्यवसायकर व शासनाने लागू केलेले इतर कराचा परतावा विहित मुदतीत भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांची राहील.
4. कंत्राटी शिपायाचे मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या 05 तारखेपर्यंत संबंधित शिपायाच्या खात्यावर NFET /ECS / रेखांकित धनादेशाद्वार जमा करणे आवश्यक राहील.
5. कंत्राटदाराने / पुरवठादाराने त्याच्या कामगारास अदा करावयाच्या पारिश्रमिकाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेली किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम इत्यादी मिळून होणारे रक्कम यापेक्षा कमी असणार नाही. तसेच, सेवा पुरवठादाराकडून उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाला उपरोक्त देय असलेले कायदेशीर दायित्वाचा समावेश् वेतनात अंतर्भूत असून संबंधित प्राधिकरणाकडे कायदेशीर दायित्व जमा करणेची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील व त्याबाबतची कागदपत्रे सेवा पुरवठादार कार्यालयाकडे वेळोवेळी जमा करील.
6. महिना संपल्यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कंत्राटदारास उपस्थिती प्रमाणपत्राची प्रत कार्यालयाकडून पाठविण्यात येईल. त्यानुसार कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी कर्मचा-याच्या उपस्थितीनुसार देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर रक्कम प्रदान करण्यात येईल.
7. कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी शिपायाला किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कार्यवाहीस पात्र असेल.
8. कंत्राटदारास / पुरवठादास रक्कम अदा करतांना आयकर) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल.
9. कायमस्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे / शासनाकडे / न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही अशा आशयाचे हमीपत्रे सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक राहील.
10. कंत्राटी शिपाई यांना कार्यालयीन कर्तव्य पार पाडतांना दुर्दैवाने काही अपघात / इजा झाल्यास त्याबाबतची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

बाह्ययंत्रणेमार्फत शिपाई पदाच्या पारिश्रमिकावरील खर्च

| अ.क्र. | तपशील | प्रती शिपाई प्रती माह पारिश्रमिक (रक्कम रुपये) |
|---|---|---|
| 1. | मूळ वेतन | ***** |
| 2. | विशेष भत्ता | ***** |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 3. | कामगार कायद्यातील तरतूदीनुसार भरावयाच्या अनिवार्य रक्कम जसे राज्य कामगार विमा योजना + कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम+ व्यवसाय कर इत्यादी | ***** |
| 4. | प्रशासकीय सेवा खर्च | ***** |
| 5. | वस्तू व सेवाकर 18% | ***** |
| 6. | सेवापुरवठादारास अदा करावयाच्या परिश्रमिकाची रक्कम प्रती शिपाई प्रती माह | ***** |

शिपाई पदासाठी या कार्यालयाच्या काही **अटी व शर्ती** आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

1. उमेदवार किमान 10 वी उत्तीर्ण असावा.
2. दिनांक 01/04/2024 रोजी उमेदवाराचे वय हे 45 वर्षापेक्षा जास्त नसावे व 23 पेक्षा कमी नसावे.
3. उमेदवारास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी.
4. उमेदवार निर्व्यसनी असावा.
5. उमेदवारास संगणक चालविण्याचे ज्ञान असावे.
6. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र हे बीड जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र असेल. त्यामुळे उमेदवारास बीड जिल्हयाचे भौगालिक ज्ञान असणे आवश्यक राहील. शासकीय कामानिमित्त आवश्यकता भासल्यास विभागाबाहेरील क्षेत्रात जावे लागेल.
7. आवश्यकता भासल्यास सुटटीच्या दिवशीही कामावर बोलाविण्याचा अधिकार सहायक संचालक, प्रस्तुत कार्यालय यांचा राहिल.

उपरोक्त अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारास शिपाई या पदासाठी प्रथम पसंती देण्यात येईल.

(वि.र.झिरपे)
सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,बीड.

Scanned with OKEN Scanner